CNRMHAH2500 0263 2011

**रे.मु.नं. १२३/२०११ मध्ये नि. क्र.७० वर आदेश**
**(मदन बाफना वि. वेणू आनंदन)**

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जामध्ये असे कथन आहे की, वादीने नि.६६ अन्वये कोर्ट कमिशनचा अर्ज दिला होता. तो मंजूर होउन मोजणी अहवाल न्यायालयात हजर झाला आहे. त्यामध्ये वादींचे दावा मिळकतीमध्ये पश्चिमेकडे प्रतिवादींनी अतिक्रमण केले असल्याचे नमूद आहे. सदरचे अतिक्रमित क्षेत्र ३७ चौ मि. वादीचे मालकीचे असून ते प्रतिवादींकडून घेणे गरजेचे आहे. त्याकामी दावा कलम २ मध्ये परिच्छेद क्र.४ दाव्याचे कामकाज चालू असताना कोर्ट कमिशनचा ............. ३७ चौ.मि क्षेत्राचा ताबा मालकी हक्काने वादीस मिळण्याकरता वादीचा दावा व दावा ७ मध्ये अ नंबर ३ (अ) (१) मध्ये प्रतिवादींनी वादीचे दावा ......... प्रतिवादींविरूध्द करण्यात यावा अशी दुरूस्ती दाव्यामध्ये करणे गरजेचे आहे. सदर दुरूस्ती फॉर्मल स्वरूपाची असून सब्सिक्वेंट इव्हंटवर आधारित आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा अशी वादीची विनंती आहे.

३. प्रतिवादींनी म्हणणे दिले व अर्जास जोरदार हरकत घेतली आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, अर्ज खरा व बरोबर नाही. मोजणीदाराची साक्ष झालेली नाही व नकाशाला नंबर पडलेला नाही. त्यामुळे दुरूस्ती करता येणार नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे वकिलांनी असा युतिवाद केला की सदरची दुरूस्ती ही अंतिम निकाल होण्यासाठी आवश्यक आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपामध्ये बदल होत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा. प्रतिवदींनी असा युक्तिवाद केला की नकाशाला नंबर पडलेला नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा.

५. वादीस दावा दुरुस्ती ही दिवाणी प्रकिया संहिताचे ६ नियम १७ प्रमाणे करता येईल सदर आदेशामध्ये असे नमुद आहे की, दाव्यामध्ये पार्टींना त्यांच्या प्लीडींगमध्ये कधीही दुरुस्ती करता येईल जर ती दुरुस्ती दोन्ही पार्टीमध्ये निर्णय देण्यासाठी व वाद निकाली करण्यासाठी आवश्यक असेल. त्याच आदेशामध्ये दाव्याचा पुरावा चालू झाल्यानंतर दुरुस्ती करता येणार नाही असे नमुद केलेले आहे.

६. सदरचा दावा हा पुराव्यासाठी नेमल्यानंतर वादीने मोजणीचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्ज मंजूर झाल्यानंतर मोजणी होउन मोजणी अहवाल न्यायालयात दाखल केलेला आहे. मोजणी नकाशा

मध्ये अतिक्रमण दाखवले असल्याने वादीने सदरचा दुरूस्तीचा अर्ज दिला आहे. वादींनी सदरची दुरूस्तीची मागणी मोजणी अहवाल आल्यानंतर केलेली आहे. मोजणी नकाशामध्ये अतिक्रमण दाखवले आहे. त्याप्रमाणे कब्जा मिळण्याची मागणी वादीने केलेली आहे. सदर दुरूस्ती ही फॉर्मल स्वरूपाची असून त्यामुळे दाव्याच्या स्वरूपात बदल होणार नाही. तसेच सदरची दुरूस्ती सब्सिक्वेंट इव्हेंट असल्याने ती मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वादींनी सदरची दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करावी.

सही/-

पारनेर
दिनांक ११.१२.२०१९

(डी. आर. बडवे),
दिवाणी न्यायाधीश क्र. स्तर,
पारनेर.

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the stenographer | Thorat U. B. |
| Name of the Court | Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Parner |
| Date of dictation | 11-12-2019 |
| Order signed by PO on | 11-12-2019 |
| Order uploaded on | 12-12-2019 |